काव्य
2020.

भव काव्यमाला

पुष्प ४ थें.

केवळ

# स्वराज्यासाठीं!

शाहीर-वसंतविहार.

प्रकाशक

केशव सीताराम ठाकरे

मिरांडाची चाळ

दर-मुंबई.

REFBK-0019522
REFBK-0019522
BHAVE & CO.
भावे आणि मंडळी, मुंबई-
बुकसेलर्स व पब्लिशर्स
ठाकुरद्वार-मुंबई

किंमत ३ आणे.

# अल्प परिचय.

महाराष्ट्रांतले नवयुगाचे शाहीर श्री. वसंतविहार यांनीं राष्ट्र-वैभव काव्यमाला गुंफण्याचें जें सत्कार्य हातीं घेतलें आहे, त्यांतलें हें चवथें पुष्प महाराष्ट्रीय रसिक भगिनी बांधवांच्या चरणीं अर्पण करण्याचा सुयोग आज मला लाभत आहे. वास्तवीक श्री. वसंतविहार यांच्या या राष्ट्राभिमानप्रेरक मधुर काव्याला मी प्रस्तावना लिहिणें म्हणजे कस्तुरीचा परिचय चिखलानें करून देण्याइतकेंच धाडसी कार्य होय. पारिजातकाची ओळख रसिकांस तेव्हांच होतें.

**साहजिकरूपवत्या भवति भवसा विभूषणं भारः ॥**
**सर्वांगसौरभिण्या दमनकवल्लयाः किमालि कुसुमेन ॥**

प्रिय बंधुभगिनींना हा 'केवळ स्वराज्यासाठीं' दणाणणारा काव्यरूपी दवणा अत्यंत प्रिय होईल, अशी आशा आहे.

दादर-मुंबई. नारळीपौर्णिमा.<br>ता. १८ ऑगष्ट सन १९२१ } महाराष्ट्राचा नम्र सेवक<br>केशव सीताराम ठाकरे

# केवळ स्वराज्यासाठीं.

## ( पोवाडा )

कवि—वसंतविहार

नमोस्तु ते जय देवि शारदे ! स्वयंप्रभे विमले !
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ध्रु० ॥
सदा वरदकर शिरीं असों दे शुभास्पदे वरदे !
काव्यलेखनीं पदोपदीं तूं प्रतिभेची भर दे ॥
स्वतंत्रतेचा शाहिर हा नव पोवाडा गाई ।
लुंग्या सुंग्या कलगितुऱ्याला स्पर्धापद होई ॥
आधुनिकांतरिं शाहिर म्हणुनी लकलकती काचा ।
पैलु पाडिले काय तरी हो रत्नभाव त्यांचा ॥
खऱ्या हिऱ्याला असो नसो वा कोंदण जांबुनदी ।
स्वयंप्रभेला हवी कशाला जहागिरी सनदी ॥
पूजनीय जरि जना होतसे राजापुरि गंगा ।
विष्णुपदीचें महत्त्व तीतें येइल कां सांगा ॥
रसिकां कृति ही भृंगा कमलिनि, चकोरांस राका ।
पिकांस कीं सहकारमंजिरी विकासवति देखा ॥
बहु मजा पुढिल चौकांत ।
रसिक हो ! रमालचि तेथ ।
बोलुं कशाला । संगें चाला ॥
कारंजें नकशीवालें ।
थुइ थुइ जल नाचत डोलें ।
खगमंडळ त्यासह खेळे ।
बाजूस हलति हिंदोळे ।

BHAVE & CO. ग्रंथ मंडळी, मुंबई.
403
१८४२२
REFBK-0019522
REFBK-001952

ऐश्वर्याच्या नरनारींचें चित्त चौकिं रमलें ।
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १ ॥
मावळियांचीं सुमनें गुंफुनि सिद्ध करी झेला
भगीरथाच्या यत्नें मिळवी स्वराज्य-गंगेला ॥
पारतंत्र्यशृंखला तोडिल्या जमवुनि संघाला ॥
स्वतंत्रतेच्या वातावरणीं ठेवि बांधवांला ॥
धर्म रक्षिला शिवसिंहानें बाणा त्या संगें ।
क्षात्र कुलाचा हिंदुत्वाचा सुखांत जन रंगे ॥
रायगडावरि राज्यारोहण हो शिवरायाचें ।
स्वर्गांतुनि सुर किन्नर उतरुनि पाहति यश त्याचें ॥
लक्ष्मीला अति हर्ष जहाला पुरीपुरी नटली ।
महाराष्ट्र-भाग्याची सीमा जणों एकवटली ॥
सुराप्सरांनीं म्हटलीं गीतें बहु आनंदानें ।
त्या गीतांचें बोल घुमविती दाहिदिशा मानें ॥
छत्रपती शिव जें जें पाही तें तें हो वीर ।
महाराष्ट्र अनुसरला मानी उदात्त गंभीर ॥

बळ नुरलें यवना अंगीं ।
गडबडलीं लुंगीं सुंगीं ।
होय इषारा । त्यांस दरारा ।
हा महाराष्ट्र वीरांचा ।
प्रासाद क्षात्रकुलाचा ।
आखाडा नव मल्लांचा ।
स्वातंत्र्यतिलक पूर्वेचा ।

समरसिंह जो अमर नांदवी, बाहु फुरफुरले ।
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ २ ॥
छत्रपतीचा-शिवसिंहाचा-छावा संभाजी ।
छत्रपतीच्या मागुनि येई गादीवर गाजी ॥

सौंदर्याचा पुतळा किंवा दुजा मदन आला ।
दिल्लीश्वर-कन्येच्या हृदया सौख्याकर झाला ॥
जन्मभरी जी बेगम राहे संभाजीसाठीं ।
" हिंदुकुलीं मम जन्म न हा हा ! पुण्य नसें गाठीं " ॥
सुरतपाक तो पथीं चालतां भुलति नगरनारी ।
नारी रत्नापरी होय त्या मदिरा बहु प्यारी ॥
सवाइ बेटा बापाहुनि जो अनुपम बळशाली ।
वाघ वाकवी मान दाबुनी दमामधें खालीं ॥
ऐशा वीरा मदिरा मोही संगति कलुषाची ।
पूर्व तयारी हा ! हा ! केली दैवें नाशाची ॥
खल कलुषानें नाग भारिला, डुलवी मंत्रानें ।
संभाजी मदिरारत वागे खलजन-तंत्रानें ॥
शिवमंत्री सर्व हुषार ।
संग्रामसिंह सरदार ।
नृपति विलासा । विटले त्रासा ।
कितिकांनीं त्यजिली सेवा ।
त्यागिलेहि कोणी जीवां ।
कलुषाचा उलटा कावा ।
व्यवहार कशास पुसावा ।
नीतिमंतजन खलसंसर्गा त्यजुनि दूर सरलें ।
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ३ ॥
दख्खनचें हें नवनृपमंडळ कळलें दिल्लीशा ।
सुवर्णसंधी योग्य मिळाली पुरवाया आशा ॥
सेनेसह औरंगजेब नृप दक्षिणेंत आला ।
नृपति कशाचा ! हिन्दुत्वार इस्लामी घाला ॥
अमीर उलउमराव, असदखा, तकरिबखा त्यांत ।
एखलास, याकुदखा, राक्षस आले निर्धास्त ॥
हिन्दुवैभवा नष्ट कराया आले दायाद ।
पकडापकडी लुटालूट हो सुरू अमर्याद ॥

काव्य ८०

शिवनृप–भास्कर तळपत असतां अस्तंगत तारे ।
दिनमणि जातां लुक लुक करिती यवन तेच सारे ॥
छेदियलेल्या तरूस फुटले अंकुर जोमांत ।
कंटकमय तो करुनि टाकिति दख्खनचा प्रांत ॥
गड सर करिती घेती ठाणीं ठळक ठळक असतीं ।
जागोजागीं पुनरपि केली यवनांनीं वसती ॥
शिवबाच्या संभाजीला । यवनांनीं कैदी केला ।
बाटविण्याला । प्रयत्न केला ।
तो तिलक क्षात्रकुलाचा ।
तो छावा शिवसिंहाचा ।
तो भूप महाराष्ट्राचा ।
तो हिरा हिंदुधर्माचा ।
प्राण समर्पण तुळापुरीं करि यवनत्व न वरिलें ।
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ४ ॥
संभाजी–वध–भूकंपानें स्वराष्ट्र हादरलें ।
स्वराज्यमंदिर रायगडीचें अवचित डळमळलें ॥
वीर मराठे क्षात्रकुळींचे स्मरले शिवबाला ।
पडत्या काळीं शिवराष्ट्राच्या लागति कार्याला ॥
उसळे सागर भिडती लाटा प्रचंड गगनाला ।
बुडते आतां स्वराज्यनौका वाटे सगळयांला ॥
चतुर वीर ते समरधीर ते दृढनिश्चयशाली ।
कर्णधार नौकेचे झाले त्या संकटकालीं ॥
हिंदु जनांचें नांव राखिलें जमवुनि संघाला ।
स्वामिकार्यतत्परता दावुनि परतविला घाला ॥
प्राणांची तिळ केलि न पर्वा स्वराज्य राखाया ।
रायगडावरि करिति मराठे आत्म्यांची छाया ॥
नेतृत्वाचा मान दिला मग येसूबाईला ।
तिच्या मतानें मंत्रिमंडळें कारभार केला ॥

सिंहासन राजारामा ।
जनतेचा वाढे प्रेमा ।
देशोद्धारा । हुरूप वीरां ।
छेदुनी यवनदंष्ट्रेला ।
राष्ट्रास मुक्त करण्याला ।
जाहले सिद्ध लढण्याला ।
राखाया । प्रभुवचनाला ।

कर्मवीर राष्ट्रास लाभतां कार्य सफल ठरलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ५ ॥

घाट घालि दिल्लीश कराया वश राजारामा ।
रायगडादि प्रमुख गडांच्या धरी मनीं कामा ॥
शिवनृप गेला संभाजीचा वध यत्नें केला ।
राजारामा वश केलें कीं तडिस हेतु गेला ॥
मनीं बांधि औरंगजेब या अशा मनोऱ्याला ।
याकुदखानें रायगडावरि हल्लाही केला ॥
परी मावळे वीर खवळले पंचानन मानी ।
समरीं पाजिति समशेरीचें यवनांना पाणी ॥
थकले, हरले उपाय सगळे, मोंगल दुर्मुखले ।
"या अल्ला क्या सेरहि दख्खन सब" ऐसें वदले ॥
पिसाळ-वंशीं सूर्याजी कुणि लोभी सरदार ।
देशमुखीला भुलुनी यवनां होई साथिदार ॥
रायगडाला सर करण्याला सहाय सूर्याजी ।
राष्ट्र बुडविण्या कारण ऐसे लोभी नर पाजी ॥

चालत्या रथाची खीळ ।
काढिती, न पाहति वेळ ।
देशद्रोही । धर्मद्रोही ।
मानाच्या तुकड्यासाठीं ।

हे श्वान शत्रुंच्या पाठीं ।
हो धनें दृष्टि उफराटी ।
स्वजनीं मग ताटातूटी ।
देशद्रोह्यां पदीं तुडवुनी वीर समरिं लढले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ६ ॥
रायगडासम दुर्ग जेधवां शत्रुकरीं गेला ।
राजारामा चिंता लागे मंत्रिमंडळाला ॥
अफाट सेनासिंधु पसरला यवनांचा त्रास ।
लागति मोर्चे मिरज पन्हाळा विशाळगड यांस ॥
प्रसंग ऐसा विकट त्यांतुनी हितपथ शोधाया ।
प्रमुख सुचविती कन्नडदेशीं धाडावा राया ॥
राजनीतिचा कावा गनिमी योग्य मराठ्याला ।
महाराष्ट्र सोडुनी निघावें ऐशा समयाला ॥
विशाळगड रांगणा दुर्ग हे जिमेखालिं घ्यावें ।
रामचंद्रपंतानें अपुलें शौर्य गाजवावें ॥
गुजर पानसंबळ आंग्र्यांनीं साहाय्यक व्हावे ।
परशुराम त्रिंबका घेउनी देशा रक्षावें ॥
युक्ति जुक्तिनें मोंगल कडवा चिरडुनि टांकावा ।
दख्खन सारा स्वतंत्र करण्या अन्य न पथ ठावा ॥

देशापरि वेश करावा ।
परि तत्वा बाध न यावा ।
एकविचारें । युक्ताचारें ।
हा महाराष्ट्र रक्षावा ।
शत्रूंचा मद उतरावा ।
मंदिरा कळस चढवावा ।
जरिपटका वरि फडकावा ।
पवित्र चित्तें पवित्र कार्या देशाच्या वरिलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ७ ॥

दुजे थाटलें मंडळ नेता प्रल्हाद निराजी ।
धनाजि जाधव, घोरपड्याचा वीरहि संताजी ॥
रथी अतिरथी महारथी जे यवनांचे काळ ।
राजारामा हितमतदानीं खंडो बल्लाळ ॥
शिवप्रभूचा चिटणिस बाका राजापुरिं होई ।
बाळाजी आवजीस शोभे खंडो या ठाई ॥
सर्व जणांनीं गांठुनि चंदी जमवावी सेना ।
समशेरीचें समरीं पाणी पाजावें यवनां ॥
विचार ऐसा झालाहि न तों कळला शत्रूला ।
हेर जयांचे पाहुनि लज्जित चाणाक्यहि झाला ॥
क्षणांत येथें, क्षणीं पुण्याला, क्षणिं साताऱ्याला ।
गुप्तवृत्त जाउनी शोधिती क्षणांत दिल्लीला ॥
दिल्लीशाचा उघड इषारा कर्नाटक देशीं ।
फौजदार कासिमखानाला "नाक्या नाक्याशीं ॥
"ठेवुनिया स्वार शिपाई ।
"पकडावें मंडळ येई ।"
ठाणेंदारा । हुकूमन्यारा ।
"ठिकाठिकाणीं ठाणीं रोखा ।
"येतील मराठे देखा ।
"पकडुनी तयांना ठोका ।
"मग दख्खनिं कसला धोका" ।
चुना फासुनी यवनानाकीं कर्नाटकिं शिरले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ८ ॥
पांडव जणुं अज्ञातवासि हें मंडळ या देशीं ।
गुप्तपणानें प्रवास करण्या नटलें बहुवेशीं ॥
त्रिपुंड्र लावुनि भाळीं कोणी रामानुजमार्गी ।
सर्वांगाला राख फासुनी होती बैरागी ॥
गळयांत बांधुनि शिवलिंगाला कुणि जंगम झाले ।
कुणि बैलांचे तांडे घेउनि सौदागर बनले ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. १९५२ (स्थळ ...)

जटाजूट नाटकी बांधुनी कुणि बनती बावा ।
चेले संगें चिलीम फुंकित गांठिति निज गांवा ॥
कुणी कापडी पाठिस पडशी करीं ध्वजा घेई ।
रुद्राक्षांच्या माळा घालुनि कुणी शैव होई ॥
राजारामी मंडळ देई तळ बेंगरुळाला ।
दैवें तेथें हास्योत्पादक देखावा झाला ॥
नृपतिपदावरि कुणि जल ओती, पुशी चरण दुसरा ।
आज्ञा काय म्हणोनी पुसतो जुळनि करा तिसरा ॥

हा थाट बघोनि तयांचा ।
कानडी धूर्त तेथिलचा ।
मित्रा बोले । चित्र निराळें ! ।
हे जरी कापडी दिसती ।
परि दिसति तसे हे नसती ।
हे गरीब कैंचे असती ।
वर्तनीं कळे श्रीमंती ।

धूर्त कानडा वदे कानडित मराठ्यांस कळलें ।
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ९ ॥
प्रसंग दुर्घट काय करावें परिणाम न ठीक ।
घाबरतां कां अशीं संकटें निवारिली कैक ॥
वदे खंडु बल्लाळ दमाचा पुतळा धीराचा ।
शिवशाहीला गाजविणाऱ्या नंदन वीराचा ॥
धरणि दुभंगो, गगन कोसळो, कडकडुनी वीज ।
पडो शिरीं परि हो क्षात्राचें न घाबरें बीज ॥
महाराज संताजी जाधव दाभाडे गाजी ।
एकपथानें, दुजा पथानें प्रल्हाद निराजी ॥
निसटुनि जावें पुन्हां मिळावें एक दिशे सारे ।
दम खावा स्थळ गांठू आम्ही कुशल व्यवहारें ॥

बंदोबस्ती कसुनि चौकशी जरि केली अमुची ।
नांव गांव पत्ता ना देतां गांठु दिशा तुमची ॥
एकेकानें मार्ग काढिला श्रेयस्कर होई ।
मागें मंडळ संकट त्यावरि यवनांचे येई ॥

भोजनांत धरुनी नेले ।
खडसुनी प्रश्नही केले ।
कोण तुम्ही रे । येथें कां रे ।
सेतुबंध रामेशाला ।
चाललों सकल यात्रेला ।
हा सर्व कापडी मेळा ।
सहवासी पुढिल पथाला ।

नग्न खड्ग शिरिं लटकत असतां लव न वचन ढळलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १० ॥

यवन मारिती पाठीवरती चाबुक सडकून
डोईवरती दगडहि देती मोठे हुडकून ॥
आम्हीं कापडी एकवचन हें न ढळे सरदारीं ।
हाल सोशिती प्राण जाय तों करिती न फितूरी ॥
दिले तोबरे मग राखेचे तरी तीच वाणी ।
पृथक् पृथक् मारिलें झोडिलें निर्दय यवनांनीं ॥
"अम्हीं कापडी" "अम्हीं कापडी" एकच हे बोल
राष्ट्रवीर खंबीर काढिती सोसुनिया हाल ॥
धन्य धन्य ते वीर जयांचें धैर्य न डळमळलें
दाहिदिशांना क्षात्रतेज तें अमोघ दरवळलें ॥
न्याय जाहला "खरे कापडी" यात्रेकरु सोडा
नसते तरि ते वदते पूर्वींच नका करूं पीडा ॥
तीन दिवस कैदेंत काढिले घडले उपवास
चवथे दिवशीं भोजन देतां शिवति न अन्नास ॥

काव्य १९०३

आह्मी यात्रेकरु बंधांत ।
सुटल्याविण अन्न न घेत ।
भंग कशाला । व्रतिं समयाला ।
शिरिं धरुनी तीव्र कृपाण ।
कुणि घेवो अमुचे प्राण ।
तरि सोडूं स्वीय व्रता न ।
ही जमीन हें अस्मान ।
या दोहोंचा मालक त्याच्या चरणिं चित्त रमलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ११ ॥
सत्याग्रह हा पाहुनि त्यांना यवन मुक्त करिती ।
वीर मराठे संकेतानें पथ अपुला धरिती ॥
इतिहासाच्या दलादलावरि देशकार्य नटलें ।
खंडो बल्लाळाचें रसिकां स्वामिकार्य पटलें ॥
मातृभूमिचे पांग फेडण्या जे जे नर झटले ।
खंडो बल्लाळाचें रसिकां स्वामिकार्य पटलें ॥
स्वामि देव, हृदयाचा राजा स्वामी चैतन्य ।
तळहातीं शिर धरुनि रक्षिती, स्वामीधन नान्य ॥
महाराष्ट्र लाजवी गुणानें अनंत गगनाला ।
हृदयीं चमकत्या नरताऱ्यांची धरि सुंदर माला ॥
वीर मराठे चंदिस आले ठळक ठळक तारे ।
सद्भाग्याचें वाहुं लागलें अनुकूलहि वारें ॥
आवर्तवशा नवी भव्यशी स्वराज्यनौका ही ।
चंदीच्या तीरास लागली नव बंदर पाही ॥
लक्ष्मीचें जणु माहेर ।
दिग्पाल जागते हेर ।
उंच हवेल्या । गगना भिडल्या ।
कीं मयें नगर रचिलेलें ।
नरनारी जन रंगेले ।
जणु गुलाब नव फुललेले ।
सौंदर्य अमित खचलेलें ॥

राजपथांतुनि रसिक चालती पुढति पद न ठरलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १२ ॥
पृथक् पृथक् तीं पथकें जमली चंदीला सारी
रायगडींचा थाट वाटला अपूर्व सरदारी ॥
अनभिषिक्त नृप न रुचे म्हणुनी करिती अभिषेक
समुल्हसित सरदार मराठे समुल्हसित लेख ॥
संभाजीच्या स्मरुनि नंदना राजाराम वदे
शिवाजिला सिंहासन मजला मंचक योग्य पदें ॥
नटली चंदी नवनृपलक्ष्मी नव्याच वेषांत
अमरावति निज पाहुं लागली रूप दर्पणांत ॥
चंदी बनली क्षणीं अयोध्या राजा रामाची ।
मंचकासनीं मूर्ति स्थापिली राजारामाची ॥
प्रजाजनांचे सरदारांचे बहु उमरावांचे
दरबारीं नजराणे आले वस्त्रभूषणांचे ॥
जनास दानें भोजन मानें चंदीला सर्वा
अलकावतिनें पाहुनि भाग्या सोडियलें गर्वा

त्या दिगंगना खुललेल्या ।
त्या अप्सराहि नटलेल्या ।
फुलें उधळिती । मंजुळ गाती ।
नव कवनें वीर रसाचीं ।
रुचि नटली स्वातंत्र्याची ।
शुभचरितें नरवीरांचीं ।
भूषणें मातृभूमीचीं ।

परिसुनि कवना तुटति छातिवर बंद भुज स्फुरले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १३ ॥
शिवशाहीची प्रधान रचना अचला ठेवोनी ।
राज्य चालवी भूपति नववा प्रतिनिधि नेमोनी ॥

आह्मी यात्रेकरु बंधांत ।
सुटल्याविण अन्न न घेत ।
भंग कशाला । व्रतिं समयाला ।
शिरिं धरुनी तीव्र कृपाण ।
कुणि घेवो अमुचे प्राण ।
तरि सोडूं स्वीय व्रता न ।
ही जमीन हें अस्मान ।
या दोहोंचा मालक त्याच्या चरणिं चित्त रमलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ ११ ॥
सत्याग्रह हा पाहुनि त्यांना यवन मुक्त करिती ।
वीर मराठे संकेतानें पथ अपुला धरिती ॥
इतिहासाच्या दलादलावरि देशकार्य नटलें ।
खंडो बल्लाळाचें रसिकां स्वामिकार्य पटलें ॥
मातृभूमिचे पांग फेडण्या जे जे नर झटले ।
खंडो बल्लाळाचें रसिकां स्वामिकार्य पटलें ॥
स्वामि देव, हृदयाचा राजा स्वामी चैतन्य ।
तळहातीं शिर धरुनि रक्षिती, स्वामीधन नान्य ॥
महाराष्ट्र लाजवी गुणानें अनंत गगनाला ।
हृदयीं चमकत्या नरतान्यांची धरि सुंदर माला ॥
वीर मराठे चंदिस आले ठळक ठळक तारे ।
सद्भाग्याचें वाहुं लागलें अनुकूलहि वारें ॥
आवर्तवशा नवी भव्यशी स्वराज्यनौका ही ।
चंदीच्या तीरास लागली नव बंदर पाही ॥
लक्ष्मीचें जणु माहेर ।
दिग्पाल जागते हेर ।
उंच हवेल्या । गगना भिडल्या ।
कीं मयें नगर रचिलेलें ।
नरनारी जन रंगेले ।
जणु गुलाब नव फुललेले ।
सौंदर्य अमित खचलेलें ॥

दुःखानें काळिज पोळें।
मुक्तिच्या पथाला डोळे।
करि तडफड अनलीं होळे।

विचार करितां खंडोजीला अंतिं साध्य दिसलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १७ ॥
पुत्र आपुला नरका पासुनि जो तारी पितया।
बंदिवास हा स्वीकाराया तयांस विनवूंया ॥
गुप्तपणानें लिहूनि कळवी श्रेष्ठ सुता पत्र।
सांप्रतच्या या दशेंत केवळ तूं माझें छत्र ॥
तुझा भरंवसा मला नंदना बहिरो वेल्हाळा।
असशिल तैसा भेट येउनी मजला या काळा ॥
मनिचें हितगुज लिहितां येइ न पत्रीं तुज बाळा।
असशिल तैसा भेट येउनी मजला या काळा ॥
पुत्र पित्याविण, पिता सुताविण, आत्म्याविण देह।
देहाविण आत्माच गमतसे यांत न संदेह ॥
भोजनिं असशिल उठुनि तसा ये हृदयाच्या राजा।
शयनीं जरि तरि शयना सोडुनि ये बहिरो माझ्या ॥
मदार माझी तुझ्यावरी ये गुप्तपणें वीरा।
भेटी अंतीं सर्व खुलासा सोडुं नको धीरा ॥

हें पत्र मिळे पुत्राला।
तो तडक धाउनी आला।
गुप्तपणांत। ये दुर्गांत।
पितयाच्या पुढती गेला।
साष्टांग प्रणाम केला।
मृदु सुमनांचा तो झेला।
उठुनिया उभा मग ठेला।

पितापुत्र नयनांसि नयन भिडतां अति गहिवरले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १८ ॥

गुण पाहोनी गुणी जनांला दिधले अधिकार ।
दिलीं इनामें किताब दिधले तुष्टाचि सरदार ॥
झुलफिकारखा मदोन्मत्त सरदार मोंगलांचा ।
दक्षिणेंत बहु करि पुंडावा त्या चिरडायाचा ॥
राजमंडळीं विचार ठरला, विडाहि पैजेचा ।
खंडोजी बल्लाळ उचलुनी थोपटि भुज साचा ॥
स्वशिरावरती कार्यभार घे गुप्त लिही सचिवा ।
चंदीच्या रोखानें अपुल्या सेना त्या जमवा ॥
दबा धरोनी अचूक शह द्या मोंगल सेनेला ।
दख्खनच्या मंत्र्यांशीं ऐसा गुप्त बेत केला ॥
स्वतां जाउनी जमवि योजना बेत मना पटला
परतुनि येतां त्रिवेदि अरुणाचलास तळ पडला ॥
यवनांस कळें निजकाळ ।
हा वीर खंडु बल्लाळ ।
जाउं न द्यावा । येथ धरावा ।
कोंडोजी विठ्ठल कोणी ।
हो कृतघ्न ब्राह्मणयोनी ।
वश त्यातें सहज करोनी ।
पकडिला सिंह कोल्ह्यांनीं ।
सिंह पकडिली परि सिंहाचें मन कोणी धरिलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १४ ॥
स्वार शिबंदी खडी फौज ती रचना ही केली ।
खल यवनांशीं कसें लढावें योजनाहि झाली ॥
हातिं घेतलें कार्य कसें अजि तडीस हें जाई ।
खंडोजीचें या चिंतेनें ग्रस्त चित्त होई ॥
हा हा दैवा काय पातकें पूर्वी म्यां केलीं ।
स्वामिकार्य मम पुरें न होतां दशा अशी झाली ॥
उत्साहानें कार्य कराया मनुजें झगडावें ।
विधिघटनेची मेख उलटी विफल तेंच व्हावें ॥

सहस्रविध दे स्वामिकारणीं होय दिरंगाई ॥
मसलत जी केली होती ।
ती कशी सफल हो हातीं ।
याच विचारें । हरप्रकारें ।
कारागृह केंवि सुटेल ।
मुक्तता कशी लाधेल ।
स्वामिकार्य पूर्ण घडेल ।
कधिं भाग्या देश चढेल ।
रचिला पाया चला रसिकहो पहा चौक पुढिले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १६ ॥
समान धर्मे अर्धकार्य हो अनुभव जगताचा ।
दुर्गावरि जन संरक्षक जो हिन्दु धर्माचा ॥
आशेचा हा किरण लाधला खंडो बल्लाळा ।
घाट घातला वश करण्याचा तदा द्वारपाळा ॥
खंडोजीची मधुरावाणी मुरली नागाला ।
मधु मुरलीची विनंति मधुरा दया द्वारपाला ॥
करुणाघन तो द्रवला वळला खंडोजिस सांगे ।
तुम्हासारिखा दुसरा आणा कुणी पुरुष आंगें ॥
नगास नग द्या उडि टाकुनिया मग जा बाहेर ।
बुरुजावरुनी, तुम्हास जग मग मुलीस माहेर ॥
आधिक याहुनी काय करुं शके तुम्हीच मज बोला ।
मी तर नोकर परक्याहातीं हलता हिंदोळा ॥
हिंन्दू बांधव तुम्हां पाहुनी येइ दया तुमची ।
करा प्रयत्ना मुक्त व्हावया जोड कल्पनेची ॥
खंडोजिस वच हे पटले ।
परि चिंतेनें धोपटलें ।
नर मज ऐसा । मिळेल कैसा ।
हा विचार चित्तीं घोळे ।

देशकारणीं विषम कल्पना कशी तुला सुचते ।
राष्ट्रसुखाची दैवा तुजला योजना न रुचते ॥
याच विचारें स्वामिकार्यरत खंडो तळमळला ।
देशकार्य अंतरतें म्हणुनी शतधा कळवळला ॥
देशभक्त वीराच्या हृदया संकट कंटकसें ।
टोंचुं लागलें, अपुरें उरलें कार्य पूर्ण कैसें ॥

चिंतेत न लागे डोळा ।
कीं प्राणचि होती गोळा ।
देशासाठीं । स्वामीसाठीं ।
राष्ट्राच्या कल्याणाची ।
स्वामीच्या सर्व सुखाची ।
ती वीरमूर्ति खंडोची ।
रात्रंदिन देवा याची ।

सोडिव ईशा बंधनांतुनी कार्य अर्ध उरलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १५ ॥
प्रमुख पुढारी हातिं लागतां यवनां आनंद
तारबियतखानास तयांतुनि हो परमानंद ॥
सुभेदार तो त्या मुलुखाचा करि आज्ञा लोकां
या पुंडाच्या दीडमणाची बेडी पदिं ठोका ॥
गळ्यास बांधुनि जड तोफेच्या साखळदंडाला
अरुणाचल किल्ल्यांत ठेविलें खंडो बल्लाळा ॥
अरुणाचलिं खंडोबल्लाळ न, उदयाचलिं अरुण !
किरण कोवळे सोडुनि होई गगनीं रवि तरुण ॥
परनर सतिला, पावक कनका, संकट वीराला
बाधक नच परि पावित्र्याच्या पोषक तेजाला ॥
वीर मराठा धीर न सोडी तीर कुठें आहे ।
गभीर संकट-सागर त्याचें यत्न करुनि पाहे ॥
कारागृहभवदुःख असह्यचि ताप तया देई ।

दुःखानें कालिज पोळें ।
मुक्तिच्या पथाला डोळे ।
करि तडफड अनलीं होळे ।

विचार करितां खंडोजीला अंतिं साध्य दिसलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १७ ॥
पुत्र आपुला नरका पासुनि जो तारी पितया ।
बंदिवास हा स्वीकाराया तयांस विनवूंया ॥
गुप्तपणानें लिहूनि कळवी श्रेष्ठ सुता पत्र ।
सांप्रतच्या या दशेंत केवळ तूं माझें छत्र ॥
तुझा भरंवसा मला नंदना बहिरो वेल्हाळा ।
असशिल तैसा भेट येउनी मजला या काळा ॥
मनिचें हितगुज लिहितां येइ न पत्रीं तुज बाळा ।
असाशिल तैसा भेट येउनी मजला या काळा ॥
पुत्र पित्याविण, पिता सुताविण, आत्म्याविण देह ।
देहाविण आत्माच गमतसे यांत न संदेह ॥
भोजनिं असशिल उठुनि तसा ये हृदयाच्या राजा ।
शयनीं जरि तरि शयना सोडुनि ये बहिरो माझ्या ॥
मदार माझी तुझ्यावरी ये गुप्तपणें वीरा ।
भेटी अंतीं सर्व खुलासा सोडुं नको धीरा ॥

हें पत्र मिळे पुत्राला ।
तो तडक धाउनी आला ।
गुप्तपणांत । ये दुर्गांत ।
पितयाच्या पुढती गेला ।
साष्टांग प्रणाम केला ।
मृदु सुमनांचा तो झेला ।
उठुनिया उभा मग ठेला ।

पितापुत्र नयनांसि नयन भिडतां अति गहिवरले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १८ ॥

गुण पाहोनी गुणी जनांला दिधले अधिकार ।
दिलीं इनामें किताब दिधले तुष्टचि सरदार ॥
झुलफिकारखा मदोन्मत्त सरदार मोंगलांचा ।
दक्षिणेंत बहु करि पुंडावा त्या चिरडायाचा ॥
राजमंडळीं विचार ठरला, विडाहि पैजेचा ।
खंडोजी बल्लाळ उचलुनी थोपटि भुज साचा ॥
स्वशिरावरती कार्यभार घे गुप्त लिही सचिवा ।
चंदीच्या रोखानें अपुल्या सेना त्या जमवा ॥
दबा धरोनी अचूक शह द्या मोंगल सेनेला ।
दख्खनच्या मंत्र्यांशीं ऐसा गुप्त बेत केला ॥
स्वतां जाउनी जमवि योजना बेत मना पटला
परतुनि येतां त्रिवेदि अरुणाचलास तळ पडला ॥
यवनांस कळें निजकाळ ।
हा वीर खंडु बल्लाळ ।
जाउं न द्यावा । येथ धरावा ।
कोंडोजी विठ्ठल कोणी ।
हो कृतघ्न ब्राह्मणयोनी ।
वश त्यातें सहज करोनी ।
पकडिला सिंह कोल्ह्यांनीं ।
सिंह पकडिला परि सिंहाचें मन कोणी धरिलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १४ ॥
स्वार शिबंदी खडी फौज ती रचना ही केली ।
खल यवनांशीं कसें लढावें योजनाहि झाली ॥
हातिं घेतलें कार्य कसें अजि तडीस हें जाई ।
खंडोजीचें या चिंतेनें ग्रस्त चित्त होई ॥
हा हा दैवा काय पातकें पूर्वीं म्यां केलीं ।
स्वामिकार्य मम पुरें न होतां दशा अशी झाली ॥
उत्साहानें कार्य कराया मनुजें झगडावें ।
विधिघटनेची मेख उलटी विफल तेंच व्हावें ॥

देशकारणीं विषम कल्पना कशी तुला सुचते ।
राष्ट्रसुखाची दैवा तुजला योजना न रुचते ॥
याच विचारें स्वामिकार्यरत खंडो तळमळला ।
देशकार्य अंतरतें म्हणुनी शतधा कळवळला ॥
देशभक्त वीराच्या हृदया संकट कंटकसें ।
टोंचुं लागलें, अपुरें उरलें कार्य पूर्ण कैसें ॥

चिंतेत न लागे डोळा ।
कीं प्राणचि होती गोळा ।
देशासाठीं । स्वामीसाठीं ।
राष्ट्राच्या कल्याणाची ।
स्वामीच्या सर्व सुखाची ।
ती वीरमूर्ति खंडोची ।
रात्रंदिन देवा याची ।

सोडिव ईशा बंधनांतुनी कार्य अर्ध उरलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १५ ॥
प्रमुख पुढारी हातिं लागतां यवनां आनंद
तारबियतखानास तयांतुनि हो परमानंद ॥
सुभेदार तो त्या मुलुखाचा करि आज्ञा लोकां
या पुंडाच्या दीडमणाची बेडी पदिं ठोका ॥
गळयास बांधुनि जड तोफेच्या साखळदंडाला
अरुणाचल किल्ल्यांत ठेविलें खंडो बल्लाळा ॥
अरुणाचलिं खंडोबल्लाळ न, उदयाचलिं अरुण !
किरण कोवळे सोडुनि होई गगनीं रवि तरुण ॥
परनर सतिला, पावक कनका, संकट वीराला
बाधक नच परि पावित्र्याच्या पोषक तेजाला ॥
वीर मराठा धीर न सोडी तीर कुठें आहे ।
गभीर संकट-सागर त्याचें यत्न करुनि पाहे ॥
कारागृहभवदुःख असह्यचि ताप तया देई ।

सहस्त्रविध दे स्वामिकारणीं होय दिरंगाई ॥
मसलत जी केली होती ।
ती कशी सफल हो हातीं ।
याच विचारें । हरप्रकारें ।
कारागृह केंवि सुटेल ।
मुक्तता कशी लाधेल ।
स्वामिकार्य पूर्ण घडेल ।
कधिं भाग्या देश चढेल ।
रचिला पाया चला रसिकहो पहा चौक पुढिले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १६ ॥
समान धर्मे अर्धकार्ये हो अनुभव जगताचा ।
दुर्गावरि जन संरक्षक जो हिन्दु धर्मांचा ॥
आशेचा हा किरण लाधला खंडो बल्लाळा ।
घाट घातला वश करण्याचा तदा द्वारपाळा ॥
खंडोजीची मधुरावाणी मुरली नागाला ।
मधु मुरलीची विनंति मधुरा दया द्वारपाला ॥
करुणाघन तो द्रवला वळला खंडोजिस सांगे ।
तुम्हासारिखा दुसरा आणा कुणी पुरुष आंगें ॥
नगास नग द्या उडि टाकुनिया मग जा बाहेर ।
बुरुजावरुनी, तुम्हास जग मग मुलीस माहेर ॥
आधिक याहुनी काय करुं शके तुम्हीच मज बोला ।
मी तर नोकर परक्याहातीं हलता हिंदोळा ॥
हिंन्दू बांधव तुम्हां पाहुनी येइ दया तुमची ।
करा प्रयत्ना मुक्त व्हावया जोड कल्पनेची ॥
खंडोजिस वच हे पटले ।
परि चिंतेनें धोपटलें ।
नर मज ऐसा । मिळेल कैसा ।
हा विचार चित्तीं घोळे ।

दु:खानें कालिज पोळें ।
मुक्तिच्या पथाला डोळे ।
करि तडफड अनलीं होळे ।
विचार करितां खंडोजीला अंतिं साध्य दिसलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १७ ॥
पुत्र आपुला नरका पासुनि जो तारी पितया ।
बंदिवास हा स्वीकाराया तयांस विनवूंया ॥
गुप्तपणानें लिहूनि कळवी श्रेष्ठ सुता पत्र ।
सांप्रतच्या या दशेंत केवळ तूं माझें छत्र ॥
तुझा भरंवसा मला नंदना बहिरो वेल्हाळा ।
असशिल तैसा भेट येउनी मजला या काळा ॥
मनिचें हितगुज लिहितां येइ न पत्रीं तुज बाळा ।
असशिल तैसा भेट येउनी मजला या काळा ॥
पुत्र पित्याविण, पिता सुताविण, आत्म्याविण देह ।
देहाविण आत्माच गमतसे यांत न संदेह ॥
भोजनिं असशिल उठुनि तसा ये हृदयाच्या राजा ।
शयनीं जरि तरि शयना सोडुनि ये बहिरो माझ्या ॥
मदार माझी तुझ्यावरी ये गुप्तपणें वीरा ।
भेटी अंतीं सर्व खुलासा सोडुं नको धीरा ॥
हें पत्र मिळे पुत्राला ।
तो तडक धाउनी आला ।
गुप्तपणांत । ये दुर्गांत ।
पितयाच्या पुढतीं गेला ।
साष्टांग प्रणाम केला ।
मृदु सुमनांचा तो झेला ।
उठुनिया उभा मग ठेला ।
पितापुत्र नयनांसि नयन भिडतां अति गहिवरले ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १८ ॥

नंदनासि हृदि धरुनि आपुल्या खंडो वात्सल्यें ।
मना टोंचती उघड करी तीं सलणारीं शल्यें ॥
खंडो बहिरो पितापुत्र हे शंतनु भीष्म नवे ।
देह घेउनी महाराष्ट्रिं या पुनरपि येति जवें ॥
पुत्र असिस तूं माझा बहिरो स्वामिकार्य अपुलें ।
सार्थक जन्मुनि देशकारणीं जरि वपु अपुलें खपलें ॥
या समयाला जरी मला तूं करिसी साहाय्य !
महाराष्ट्र उपकारिं तुझ्या मग होइल तत्कार्य ॥
दो दिवसाची तनु हे साची पाड इचा काय ।
ममत्व सोडुनी शिरावरी घे महाराष्ट्र–कार्य ॥
खल यवनांनीं राज्य आपुलें गिळंकृताचि केलें ।
दाढेंतुनि तें काढायास्तव प्रयत्न बहु केले ॥
छत्रपती चंदीस तेथुनी पाठविणें सेना ।
हाच असे अवकाश तयारी जय्यत याच दिना ॥

शत्रूंच्या करिं सांपडलों ।
संकटांत मी हा ! पडलों ।
पुरवी हेतू । मजसाठीं तूं ॥
बंदिवास पतकरुनीया ।
करि मुक्त तुझ्या या पितया ।
स्वामिकार्य सिद्धिस न्याया ।
राष्ट्रास भाग्यदिन याया ।

खंडोजीनें शंतनुसम निज तनया विनवियलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ १९ ॥

राष्ट्रभक्त पितयाची वाणी संजीवनज्योती ।
बहिरूच्या हृदयांत भडकवी क्षात्रकर्मस्फूर्ती ॥
राष्ट्राकरितां प्राण वेंचणें हाच खरा धर्म ।
आत्मयज्ञ हा चिटणीसांच्या घरचा कुळधर्म ॥

पितृपदाची तोडी बेडी चढवि स्वयें चरणीं ।
सिंहाचा बहिरोजी छावा, बीज तशी करणी ॥
साखळदंडहि काढुनि झटदिशि गळयांत अडकविला ।
या दृश्यासम दृश्यचि न दिसें इतिहासीं कविला ॥
जा तुम्हि बाबा जा लवकर जा करा कार्य पुरतें ।
महाराष्ट्रभू पारतंत्र्यपंजरीं पहा झुरते ॥
मोंगल हे खल राक्षस केवळ देति तिला पीडा ।
मुक्त करा तिज जा तुह्मि बाबा रक्षा तद्रीडा ॥
तुम्हासारख्या वीरापोटीं पुत्र शोभण्याला ।
द्या आशीर्वच या बहिरोला जा ह्मणिं कार्याला ॥

पाहुनिया पुत्रप्रेमा ।
तुलनेस जयास न सीमा ।
गंहिवर आला । खंडोजीला
प्रेमाचे अश्रू बनती ।
नयनांतुनि धारा गळती ।
वदनांतुनि शद्ब न निघती ।
ते शांत स्तब्ध रहाती ।

निरोप घेतां तनया प्रेमें हृदयाशीं धरिलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ २० ॥

उडी टाकुनी बुरुजावरुनी चंडोल उडाला ।
स्वामिभक्त खंडोनें दुर्गा रामराम केला ॥
देशासाठीं स्वामीसाठीं पुत्र बळी देई ।
संकट येतां यत्नीं अपुल्या माघार न घेई ॥
घेउनि चंदिस फौज शिबंदी रिपुसंगें लढला ।
जबरदस्त यवनांस संगरीं वीर पुरा पडला ॥
शिवशाहीचें नांव राखिलें सर्व मराठ्यांनीं ।
मर्दाची तलवार! यशाची कधीं न तिज हानी ॥

करुनि लांडगेतोड पळविलें समरीं यवनाला ।
वीर मराठे स्मृति देती निज रिपुला 'ये भाला' ॥
यवन-तुरंगम जलहि न पीती वीरां घाबरती ।
धनाजि जाधव संताजी जलिं प्रतिबिंबित दिसती ॥
विजयि वीर ते जरिपटक्याला तोलित डौलानें ।
परतुनि आले निजनगराला अति आनंदानें ॥

गर्जला मराठा सारा ।
दुमदुमे शहर सातारा ।
स्वातंत्र्याची । लक्ष्मी साची ।
तरुवेली हर्षित होती ।
निर्झर मधु गीतें गाती ।
सरिताहि सवेग वहाती ।
सागरास येई भरती ।

स्वातंत्र्य-प्रतिबिंबित झालें महाराष्ट्र सगळें ।
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ २१ ॥

बळी देउनी पुत्र पोटचा करी राष्ट्रकार्या ।
जमीन जुमला कशास गौरव त्या वीरा आर्या ॥
पराक्रमाचे तंतु जरीचे भगव्या झेंड्याला ।
लावुनि ज्यानें राष्ट्रनिशाणा जरिपटका केला ॥
भाग्यगिरीवर खंडो, बहिरो शिखरावरि चढला ।
पारतंत्र्य-अंधार विक्रमें गिरिगुहरीं दडला ॥
पितयासाठीं स्वामीसाठीं कारागृहिं राहे ।
राष्ट्राचें शुभ पुण्यकार्य तो आनंदें पाहे ॥
स्वसुखावरती देई तिलांजुलि तातवचासाठीं ।
भीष्मासम बंदींत काढि दिन बहिरो तो जेठी ॥
कर्मवीर बहिरोपरि जोंवरि वीरपुत्र असती ।
पारतंत्र्य हें नांव कशाला भरतभूमिवरती ॥

बाटविलें बहिरोला वधिलें अमानुषत्वानें ।
खल यवनांनीं, हाल न वदवति कवीस कवनानें ॥
खंडोला वृत्तहि कळलें ।
मन त्याचें बहु कळवळलें ।
परि गंभीर । मनांत वीर ॥
तो बाणा क्षात्रकुलाचा ।
तो चेला शिवसिंहाचा ॥
अभिमान पुरा राष्ट्राचा ।
उगविला सूड शत्रूचा ।
जरिपटक्याचें पुन्हा रायगडिं निशाण फडकविलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ २२ ॥
खंडोसम जे स्वार्थत्यागी कुणी महाभाग ।
चरणिं तयांच्या प्रेमें सादर काव्यमधुपराग ॥
वीर बेगडी आज कालचे क्षात्रिय म्हणणारे ।
देशभक्तही बोलघेवडे वरवर नटणारे ॥
पितयासाठीं कारागृहगत वीर मला दावा ।
देशासाठीं बांधुनि घेई साखळदंडा वा ॥
स्वामीसाठीं दीड मणाची बेडी पदिं घाली ।
कर्मवीर ते मला दाखवा भारतिं या कालीं ॥
छांछुं करुनी देशभक्तिची ज्योत न घे पेट ।
हतबलास लागते कशाला सागरांत बेट ॥
ऐक्यवासना पूर्वींच्या परि कुठें मला बोला ।
संप्रति केवळ मात्सर्याचा सजलेला डोला ॥
जातिभेद हे डोले होतिल कधिं नकळे थंडे ।
तातभक्त बहिरोसम निघतिल कधीं पुत्र गुंडे ॥
फेडाया पांग पित्याचे ।
निज भारतभूमातेचे ।
सुख द्यायाला । निजदेशाला ।
स्वातंत्र्यास्तव लढण्याला ।

मराठी ग्रंथ संग्रहालय १९५४ ठाणे

परदास्या तुडवायाला ।
विजयश्री मिळवायाला ।
अजरामर जगिं व्हायाला ।
खंडो बहिरो ! पुन्हां अवतरा राष्ट्रकार्य उरलें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें ॥ २३ ॥

सरस्वतीच्या पदप्रसादें प्रस्तुत पोंवाडा ।
चोविस चौकी रसिकांसाठीं बांधियला वाडा ॥
शारदीय या छत्राखालीं प्रति चौकामाजी ।
शिल्पकलेचीं कामें पाहुनि रसिकराज राजी ॥
प्रतिभा भामा प्रति चौकांतुनि फिरवी रसिकाला ।
कुलवंताची कन्या नटली विनयवती बाला ॥
पश्चिमदेशीं जरि फिरलेली कुलरीत न सोडी ।
निजधर्मीं विश्वास तिचा बहु त्यांतचि तिज गोडी ॥
परदेशींच्या तिच्या मैत्रिणी नटती नव वेषीं ।
सहवासाला राहे परि ही इची रीत देशी ॥
कुणि म्हणतील ही भांग न तिरपा, नासाग्रें न चमकी ।
नेसली न ही तलम पातळा, चाल नसे तुरकी ॥
पायिं न पैंजण, हातिं रुमाल न, मारि न नयनांला ।
हाव भाव इस कांहिं न माहित, बहु साधी बाला ॥

प्रतिभा ही सरदाराची ।
नंदिनीवृत्ति वीराची ।
हितमित बोले । सविनय चाले ।
जाणे न बोल कलगीचे ।
सात्विकपण वरि सलगीचें ।
गांभीर्य इचें जलधीचें ।
अलुमाळ तेज सुमतीचें ।
बघुनि "वसन्तविहार" कवित्वा महाराष्ट्र डुललें ॥
प्रसादकिरणें कविमानस हें पुंडरीक उमलें २४ ॥

REFBK-0019522
REFBK-001

## सर्व प्रकारच्या रक्तदोषांवर

# दिव्य रसायन.

आह्मी तंजावरी पाठाप्रमाणें, रा. ब. डोंगरे केमिस्ट यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं अति श्रमानें **शतपुटी गंधक** तयार केला आहे. महारोग ( रक्तपित्ती ) नवा व जुनाट अंगांत मुरलेला उपदंश (गरमी), नानाप्रकारचे प्रमेह (परमा), प्रदर ( धुपणी ), गंडमाळा, मधुमेह, संधिवायु, कोड, इसब, कच्च्या पान्याचे सर्व दोष, नपुंसकत्व वगैरे विकार या महारसायनच्या योगानें त्वरित बरे होऊन शरीरप्रकृति पूर्वीप्रमाणें निर्दोष होते. महाराष्ट्रांत आजपर्यंत हें दिव्य औषध कोणींच तयार केलें नव्हतें. याशिवाय आमच्या कारखान्यांत अनेक नामांकित व खात्रीचीं देशी औषधें तयार झालीं असून, त्यांची सर्वत्र प्रशंसा होत आहे. माहितीसाठीं आमचा क्याटलॉग मागविल्यास फुकट पाठविला जाईल.

**वसंत आणि कंपनी,**

मालक, डेक्कन फार्मसी, कसबा पेठ, पुणें शहर.

## वज्रप्रहार ग्रंथमाला.

### संपादक—केशव सीताराम ठाकरे.

नवमतवादाचा पुरस्कार करणाऱ्या वज्रप्रहार ग्रंथमालेचा पहिला ग्र **भिक्षुकशाहीचें बण्ड** गेल्या श्रीशिवजयंत्युत्सवाच्या दिवशीं प्र द्र होऊन सत्याभिलाषी महाराष्ट्रीयांच्या सेवेला रवाना झाला. प्रस्तुत पुस्त त जातिभेद, अनुवंशिक संस्कार, अस्पृश्योद्धार, ग्रंथप्रामाण्य, पुराणें, तीर्थया ।, अवतार—रहस्य इत्यादि अनेक मुद्यांवर आधुनीक चिकित्सक दृ वें सणसणीत निस्पृह विवेचन आलेलें असून, लाला लजपतराय, डॉ० टागोर, दयानंद सरस्वति, रमेशचंद्र दत्त, मॅक्समुलर, रॅगोझीन, इवॉन ब्लॉक इ० अनेक पौर्वात्य पाश्चात्य विद्वानांच्या ग्रंथांतील शेंकडों उताऱ्यांनीं त्या विवेचनाचा सत्यार्थ सिद्ध केलेला आहे. सध्यां हिंदुस्थान व हिंदुजन संक्रमणावस्थेंत आहेत. नाना मतांचा गलबला सुरू असून कोणी पुसेना कोणाला अशा प्रस्तुतच्या परिस्थितींत प्रत्येक राष्ट्राभिमान्यानें हा ग्रंथ अवश्य वाचून मनन केल्याशिवाय मुळींच राहूं नये. ग्रंथाची किंमत **दोन रुपये.** सध्यां कांहीं दिवस रजिष्टर्ड व्ही. पी. खर्च माफ. पुस्तकें मागविण्याचा पत्ता—सेक्रेटरी, वज्रप्रहार ग्रंथमाला, २० मिरांडाची चाळ, दादर, मुंबई नं. १४.

मुंबईः—भायखळा, परेलरोड, घर नंबर ३५४४ येथें तत्त्वविवेचक छापखान्यांत रा. विठ्ठल तानाजी मोडक यांनीं छापिलें, तें रा. केशव सीताराम ठाकरे, यांनीं २० मिरांडाची चाळ, दादर, मुंबई नं. १४ येथें प्रसिद्ध केलें.